सविनय सादर नमस्कार, जवळपास पंचवीस वर्षांपूर्वी शालेय शिक्षकांनी तसेच पालकांनी मला सुचवले होते की तू पुढे संस्कृत शिक. माझी आई आणि वडील दोघे ही टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे माजी विद्यार्थी असल्याने त्यांना खात्री होती की माझे संस्कृतचे शिक्षण इथे तज्ञांच्या मार्गदर्शनात उत्तमरीत्या होईल. परंतु तेव्हा जर्मन भाषा तज्ञांची गरज आणि नोकरीसाठीच्या सुवर्णसंधी लक्षात घेऊन मी जर्मन भाषेत पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला. विद्यार्थीदशेत असतानाच जर्मनीमध्ये एका सुट्टीच्या अभ्यासक्रमासाठी जाण्याची संधी मिळाली आणि तिथे गेल्यानंतर तिथल्या जर्मन शिक्षकांनी मला विचारले, संस्कृत शिकली आहेस का? बोलता येते का? संधी, समास आदी व्याकरणाबद्दल तुला काय आणि किती माहिती आहे? तेव्हा मला "काहीच माहित नाही" म्हणायला अत्यंत लाज वाटली. 'तुमची भाषा असून तुला बोलता येत नाही, त्याबद्दल काहीच माहित नाही मग तुमची संस्कृती कशी टिकणार?' असे त्यांनी म्हटल्यावर एक जोरदार चपराक मिळाली. तेव्हाच मनोमन ठरवले की संस्कृत शिकल्याशिवाय हा जन्म सार्थकी लागणार नाही. मग नोकरी, घर सांभाळत पतीच्या सहकार्याने आणि उत्साहवर्धक शब्दांमुळे गेली पाच वर्षे सलग टिळक महाराष्ट्र विद्यापीठात प्रथम विशारद आणि नंतर पारंगत पूर्ण केले.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठातील विद्वान, अनुभवी आणि मदतीसाठी कायम उपलब्ध असलेल्या शिक्षक वर्गाकडून संस्कृत भाषेविषयी गोडी निर्माण झाली. प्रत्येक वर्षासाठी विचारपूर्वक तयार केलेला अभ्यासक्रम आम्हा विद्यार्थ्यांना विविध विषयांची तोंडओळख करून देण्यास उपयुक्त ठरला. वेद, साहित्य, साहित्यशास्त्र, नाट्य, उपनिषदे, वेदांगे, धर्मशास्त्र, दर्शने असे बरेच विषय आम्हाला अभ्यासण्यास मिळाले. जितके शिकू तितके कमीच आहे असे प्रत्येकवेळीच वाटत राहिले. ज्ञानी शिक्षकांच्या सहवासात राहून गुण तर मिळालेच पण जीवनाकडे नव्याने पाहण्याची एक संधी देखील मिळाली. त्यांच्या अनुभवातून आलेल्या अध्यापनामुळे भारताविषयी, भारतीय संस्कृतीविषयी आणि भारतीय परंपरांविषयी अत्यंत अभिमानास्पद अशी भावना जागृत झाली. भाषा बोलली जाते त्या प्रदेशाचे, देशाचे, संस्कृतीचे त्याचबरोबर तेथील समाजाचे प्रतिनिधित्व करत असते, याची जाणीव निर्माण झाली. जर्मन भाषा अध्यापनाच्या पंधरा वर्षांच्या गाढ्या अनुभवाने हेच लक्षात आले की परकीय भाषा मला स्वदेश आणि स्वसंस्कृती हयांचा सखोल अभ्यास करण्यास उद्युक्त करते आहे, माझे बीज काय आहे, कुठे आहे याचा शोध घेण्यास प्रवृत्त करते आहे. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे माझ्या हया संस्कृत अध्ययन प्रवासात तसेच संस्कृत भाषेमुळे अंतर्मुख होऊन सुरू झालेल्या अध्यात्मिक प्रवासात मोठे योगदान आहे. त्याबद्दल मी विद्यापीठाची आणि माझ्या गुरुवर्यांची ऋणी आहे. धन्यवाद.



सौ. आशी समीर नाईक
पुणे

मी टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून १९९५ मध्ये ‘संस्कृत विशारद’ ही पदवी संपादन केली आणि तब्बल 30 वर्षांनी ‘भारतविद्या पारंगत’ पूर्ण केले. ‘विशारद’ केले, तेव्हा लगेचच पारंगतही करायचे होते. परंतु काही कारणाने ते जमले नाही. मनात मात्र इच्छा कायम होती. गेल्या ३० वर्षांत टिमविच्या सदाशिव पेठेतील वाड्याचे बाह्यरूप बदलून त्याचे आता सुसज्ज इमारतीत रूपांतर झाले आहे. मात्र, सर्व प्राध्यापकांचा आपापल्या विषयाचा व्यासंग, अध्यापनातील हातखंडा आणि विद्यार्थ्यांना विषयाची गोडी लावण्याची वृत्ती आजही तशीच कायम आहे. तीस वर्षापूर्वी टिमवि हे ज्ञानमंदिर तर होतेच; पण माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांचे ते ‘दुसरे घर’च होते. आजही तोच जिव्हाळा टिमवित कायम असल्याचा प्रत्यय आला

मी ‘विशारद’ करत असताना मला तीन-चार वर्षे सीनियर असणारे, माझ्या वर्गात असणारे आणि मला ज्युनियर असणारे टिमविचे तेव्हाचे विद्यार्थी मला पारंगतला शिकवायला होते. त्या सर्वांविषयी मी आदर आणि कृतज्ञता व्यक्त करते. प्राचीन भारताचा अभ्यास करत असताना बऱ्याचदा मनात अभिनिवेश उत्पन्न होण्याची शक्यता असते. मात्र, भारतविद्या किंवा प्राचीन भारताचा इतिहास हे एक सामाजिक शास्त्र आहे आणि त्याची मांडणी, पुनर्मांडणी करत असताना पुराव्यांची आवश्यकता असते, याची इथल्या प्राध्यापकांनी नेहमीच जाणीव करून दिली. त्यामुळे ‘भावनेला येऊ दे गा शास्त्र काट्याची कसोटी’ असे म्हणत भारतविद्येचा अभ्यास करता आला. पुरातत्त्वशास्त्र, प्राचीन स्थापत्य, नाणकशास्त्र, मूर्तिशास्त्र, हिंदू-बौद्ध-जैन कलाविष्कार, तत्त्वज्ञान, धर्म, संस्कृत- पाली-प्राकृत भाषा व साहित्य या विषयांच्या उत्तम अध्यापनामुळे प्राचीन बृहत्तर भारताविषयी जिज्ञासा निर्माण झाली आहे.

‘भारतविद्या पारंगत’ हा दोन वर्षांचा अभ्यासक्रम पूर्ण करत असताना विद्वान शिक्षक आणि अभ्यासू सहाध्यायी यांच्याबरोबर झालेल्या चर्चांमुळे समृद्ध होण्याचा अनुभव मिळाला. ‘संस्कृत विशारद’ करत असताना कॉलेजच्या अभ्यासाव्यतिरिक्त दुसरे कुठलेच व्यवधान नसल्याने अध्ययन अध्यापनाचा मनमुराद आनंद घेता आला. मात्र, पारंगत करत असताना घर, नोकरी आणि अन्य बरीच व्यवधाने सांभाळून अभ्यास करणे जमेल की नाही, अशी वारंवार शंका वाटायची. दुसऱ्या आणि तिसऱ्या सत्राचे सर्व पेपरही मला देता आले नव्हते. अशा स्थितीत शिक्षकांनी आणि वर्गातील मित्र-मैत्रिणींनी दिलेला विश्वास लाखमोलाचा ठरला आणि हा अभ्यासक्रम मी प्रथम क्रमांकाने पूर्ण करू शकले. विभागप्रमुख डॉ. मंजिरी भालेराव यांच्यासह सर्व शिक्षक आणि टिमविविषयी कृतज्ञता व्यक्त करताना, मनात अतिशय आनंदाची भावना आहे.

- शुभांगी संजय तांबट (देवरे)



टिळक महाराष्ट्र विद्यापीठाची पहिली ओळख शाळेतल्या शिक्षिकांमुळे आणि विद्यापीठ घेत असलेल्या परिक्षांमुळे झाली. विज्ञानाबरोबरच भाषेची आवड असल्याने बारावीनंतर मी टि. म. वि. च्या बालमुकुंद लोहिया संस्कृत व इंडॉलॉजी विभागात संस्कृत विशारद पदवीसाठी प्रवेश घेतला.

मी मराठी बरोबर इंग्रजी भाषेत लिहिण्याचे कौशल्य सतत वाढावे यासाठी इंग्रजी माध्यमातून उत्तरपत्रिका लिहिण्याचे ठरवले. आमच्या वर्गात आम्ही फक्त दोघीजणी इंग्रजीत उत्तरे लिहिणार होतो. तरी प्राध्यापकांनी आम्हाला अभ्यासक्रमातील संस्कृत पुस्तकांच्या मराठी भाषांतराबरोबर इंग्रजी, हिंदी भाषांतरांची माहिती दिली. काही प्राध्यापकांनी त्यांची स्वतःच्या संग्रहातील पुस्तके आम्हाला दिली. त्यांचा स्नेह सदैव स्मरणात राहील.

काही प्राध्यापकांनी संस्कृत टीका बारकाईने कशी वाचावी हे शिकविले, तर काहींनी व्याकरण समजून घेतल्याने काव्यातील गोडी अजून खुलते हे दाखवले. वेद आणि व्याकरण हे कठीण विषयसुद्‌धा सोपे करून शिकवले. ह्याचा स्वयं-अध्ययनाच्या वेळी व नवीन विषय समजून घेताना फायदा होतो.

सुरुवातीला कोव्हिडचा काळ होता तेव्हा खासकरून, आणि नंतरही ऑाफिसमधील सर्व लोकांनी कायम मदत केली. त्यांच्यामुळे आणि online system मुळे कार्यालयीन कामे, जी दरवर्षी करावी लागतात, ती सहज झाली.

संस्कृत विभागाला जगभरातील अनेक विद्‌वान नेहमी भेट देतात. त्यामुळे त्यांचे विचार प्रत्यक्ष ऐकण्याची आणि त्यांच्याशी संवाद साधण्याची संधी मिळते. विभागाला सध्याच शंभर वर्षे पूर्ण झाली, तेव्हा तर वर्षभर व्याख्याने आयोजित करण्यात आली. तसेच टि. म. वि. च्या प्राध्यापकांना त्यांच्या कामावर व आवडत्या विषयांवर बोलायला विविध व्यासपीठांवर बोलावले जाते. आता तंत्रज्ञानामुळे ही व्याख्याने ऐकता येतात.

दररोज विभागात आल्यावर लोकमान्य टिळकांच्या अर्धपुतळ्याकडे पाहून आपणही या शतकोत्तर परंपरेचा भाग आहोत हे जाणवते. हे भाग्य असेच पुढील पिढ्यांना मिळत राहो.

सिरा राहुल आठले

(संस्कृत पारंगत प्रथम वर्ष)

